वाचले :-

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०११ मधील सुधारीत तरतूदी.

२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/ १६-ब, दिनांक ०७ मे, २०२१

३. महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग चार-ब,माघ२९ शके १९४१ दि. १८/०२/२०२०

४. पदोन्नती समिती सभा दिनांक ०७/०२/२०२४ चा सभावृत्तांत.

५. मा.आयुक्त सो यांचा दिनांक ०८/०६/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८, सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/३/कावि/८४९/२०२४
दिनांक :१०/०६/२०२४

**विषय :- 'मुख्य आरोग्य निरीक्षक' पदावरील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर 'मुख्य आरोग्य निरीक्षक' या अभिनामाची पदे पे लेवल एस-१५ वेतनश्रेणी र.रु. ४१८००-१३२३०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. त्यापैकी रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी दिनांक ०७/०२/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व 'आरोग्य निरीक्षक' या पदावरील कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, संगणक अर्हता, मत्ता व दायित्व, आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादी सेवाविषयक तपशिल पडताळून, खालील कर्मचा-यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन तसेच दिनांक ०७/०५/२०२१ रोजीचे शासन निर्णय तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार 'मुख्य आरोग्य निरीक्षक' या पदावर पे लेवल एस-१५ वेतनश्रेणी र.रु. ४१८००-१३२३०० वेतनश्रेणीत पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे.

| अ.क्र | आरोग्य निरीक्षक पदाची दि.०१/०१/२०२४ अखेरची अंतिम स्वरुपाची सेवा ज्येष्ठता सूचीमधील क्र. | कर्मचा-यांचे नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग | पदोन्नतीने द्यावयाचा नेमणूकीचा विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ९ | श्री.डवरी उध्दव ज्ञानेश्वर | ज्येष्ठतेनुसार | आरोग्य मुख्य कार्यालय |

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व दि. ७/०५/२०२१ चे शासन निर्णयास अधिन तसेच सदर पदोन्नती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१, रिट पिटीशन क्र.(स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट पिटीशन क्र. ४२०७/२०१३ व मे. दिवाणी न्यायालय आकुर्डी येथे रे.दावा नं.११/२०१७ मध्ये होणा-या निर्णयाच्या अधिन राहून उपरोक्त नमूद कर्मचा-यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार 'मुख्य आरोग्य निरीक्षक' या पदावर पे लेवल एस-१५ वेतनश्रेणी र.रु. ४१८००-१३२३०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे. तसेच उपरोक्त नमूद कर्मचा-यांना त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.५ मध्ये नमूद केलेल्या

विभागामध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत असून संबंधित विभागप्रमुखांनी त्यांना सविस्तर कामकाज वाटप करावे.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

प्रति,
संबंधित कर्मचारी
प्रत-
१) लेखा विभाग २) लेखापरिक्षण ३) सामान्य प्रशासन टेबल क्रमांक ९,१०, १२, १४, संगणक कक्ष
४) पिं.चिं.म.न.पा कर्मचारी महासंघ ५) पिं.चिं.म.न.पा कर्मचारी सेवकांची सह.पतसंस्था
६) सर्व संबंधित विभाग

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त, साप्रवि
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८